आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

२२ जुलै २०२४ - सोमवार

२०२३-२४च्या आर्थिक सर्वेक्षण अहवालात आर्थिक वर्ष २०२४-२५ वर्षासाठी सकल राष्ट्रीय उत्पादन वाढीचा दर साडे सहा ते सात टक्के राहण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी लोकसभेत केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामण यांनी आर्थिक पाहणी अहवाल सादर केला. जागतिक स्तरावर आर्थिक कामगिरीत अनिश्चितता असताना आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये देशांतर्गत वाढीला चालना देणाऱ्या घटकांमुळे आर्थिक वाढीला मदत मिळाली असल्याचं अहवालात म्हटलं आहे. रिझर्व्ह बँकेनं आर्थिक वर्ष २०२५ साठी चलनफुगवट्याचा दर साडे चार टक्के आणि आर्थिक वर्ष २०२६ साठी चलनफुगवट्याचा दर ४ पूर्णांक १ दशांश टक्के राहण्याचा अंदाज व्यक्त केला आहे.

**<><><><>**

नीट युजी परीक्षेची प्रश्नपत्रिका फुटण्याचा प्रकार केवळ पाटणा इथं झाल्याचं केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी आज लोकसभेत सांगितलं. नीट परीक्षेतल्या घोटाळ्याची चौकशी सीबीआय मार्फत चालू असून याप्रकरणी न्यायलयात सुनावणी सुरु आहे. असं ते म्हणाले. देशभरात ४हजार ७०० केंद्रांवर नीट युजी परीक्षा घेण्यात आली. त्यातल्या एका केंद्रावरच अनियमतता झाल्याची नोंद आहे, असं एका पुरवणी प्रश्नाच्या उत्तरात त्यांनी सांगितलं. लोकसभेतले विरोधी पक्ष नेता राहुल गांधी यांनी स्पर्धापरीक्षा यंत्रणेबद्दलचा मुद्दा उपस्थित केला.

**<><><><>**

संसदेत उद्या सादर होणारा अर्थसंकल्प हा अमृत काळातला महत्वाचा अर्थसंकल्प असेल, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू होण्याआधी संसद भवन परिसरात ते बातमीदारांशी बोलत होते.

विरोधक आपलं अपयश झाकण्यासाठी संसदेतला वेळ खर्ची घालत आहेत. अशी टीका मोदी यांनी यावळी केली.

सर्व राजकीय पक्षांनी आपली पक्षीय धोरणं बाजूला ठेवून पुढच्या साडे चार वर्षांसाठी स्वतःला देशासाठी समर्पित करण्याचं आवाहन मोदी यांनी केलं. राजकीय पक्षांनी २०२९ मध्ये होणाऱ्या लोकसभा निवडणुकीवेळी राजकारण करावं, मात्र तोपर्यंत शेतकरी, युवक आणि देशाच्या सक्षमीकरणासाठी काम करावं असंही मोदी म्हणाले.

<><><><><>

कंपनी कायद्यातले ६३ मोठे गुन्हे रद्द करण्याच्या निर्णयामुळे बाजारपेठेला गती मिळाली असून प्रलंबित प्रकरणं कमी झाली, तसंच देशात व्यवसाय करणं सोपं झालं, असं प्रतिपादन सरकारनं आज केलं. प्रलंबित प्रकरणं कमी करण्यासाठी कॉर्पोरेट कायदे मंत्रालयानं सन २०१७ आणि २०२३मध्ये दोन विशेष उपक्रम राबवल्याची माहिती अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासाला मांडलेल्या पुरवणी प्रश्नांना उत्तरं देताना दिली.

<><><><><>

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यक्रमांमध्ये भाग घ्यायला सरकारी कर्मचाऱ्यांना असलेली बंदी केंद्र सरकारनं उठवली आहे. तत्कालीन प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांनी नोव्हेंबर १९६६मध्ये ही बंदी लागू केली होती. ती मागे घेण्याचा निर्णय कर्मचारी, सार्वजनिक तक्रारी आणि निवृत्तीवेतन मंत्रालयानं घेतला आहे.

<><><><><>

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी आज सह्याद्री अतिथीगृहात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. या भेटीत

जलसंपदा, दुधाचे दर आणि साखर कारखान्यांचे काही प्रलंबित प्रश्न यासहित अनेक विषयांवर त्यांच्यात सखोल चर्चा झाल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

**<><><><><>**

राज्यात ठिकठिकाणी मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झालं आहे. अनेक ठिकाणी सखल भागात पाणी साचलंय, तर ठिकठिकाणी नदी नाल्यांचे प्रवाह फुगले आहेत.

राजधानी मुंबईत शहर भागात ८२ मिलीमीटर, पूर्व उपनगरात ९६ तर पश्चिम उपनगरात ९० मिलीमीटर पावसाची नोंद झाली. आजही पाऊस कायम असल्याने मुंबईत ठिकठिकाणी पाणी साचून वाहतूक कोंडी झाली.

**रत्नागिरी** जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून सलग सुरु असलेल्या पावसाने आज थोडीशी उसंत घेतली आहे. नद्यांची पाणीपातळीही आता ओसरू लागली असून, दुपारी दोन वाजताच्या स्थितीनुसार खेडमधली जगबुडी आणि राजापुरातली कोदवली या दोनच नद्या इशारा पातळीवरून वाहत आहेत.

**धुळे** शहरासह तालुक्यातल्या अनेक गावांमध्ये मध्यम स्वरुपाचा पाऊस होत आहे. यामुळे शेतकरी वर्ग सुखावला असून पिकांना संजीवनी मिळाली आहे.

**सांगली** जिल्ह्यातल्या वारणा आणि कृष्णा नदीच्या पाणलोट क्षेत्रात चांगला पाऊस पडत असून वारणा नदी दुथडी भरून वाहत आहे तर कृष्णा नदीची पाणीपातळीही वाढली आहे.

**भंडारा** जिल्ह्यात लाखांदूर तालुक्यातल्या ओपारा गावात पूरस्थिती निर्माण झाली आहे. दोन हजार लोकसंख्येच्या या गावात तीनशे पेक्षा जास्त घरांमध्ये पाणी शिरलं

आहे. पूरग्रस्त नागरिकांना शासकीय गोदामात स्थलांतरित करण्याच्या सूचना तालुका प्रशासनाने दिल्या आहेत.

**जळगाव शहरासह** जिल्ह्यातल्या बहुतांश भागात काल रात्रीपासून दमदार पावसाने हजेरी लावल्यामुळे शेतकरी सुखावला आहे.

//<><><><><>//